| CNR No.: MHAM170004252024 | नियमित फौजदारी खटला क्रमांक ४५/२०२४ | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :– | ०१.०४.२०२४ | | |
| | नोंदणी तारीख | :– | ०१.०४.२०२४ | | |
| | निकाल तारीख | :– | ०२.०६.२०२६ | | |
| | कालावधी | :– | वर्ष | महिना | दिवस |
| | | | ०२ | ०२ | ०१ |
| | निशानी क्रमांक | :– | २० | | |

फॉर्म क्रमांक ३२
भाग अ
न्यायनिर्णय
[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (i)]

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिवसा, ता. तिवसा,**
**जिल्हा – अमरावती यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी रोहिणी वि. मनोरे)**

**न्यायनिर्णय**

**(घोषीत दिनांक ०२.०६.२०२६)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.४५/२०२४**

**सरकार विरूध्द चंद्रवदन ऊर्फ कपील भिमराव खोब्रागडे**

**अपराध क्रमांक ११०/२०२४ पोलीस स्टेशन, तिवसा**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, तिवसा, ता. तिवसा, जिल्हा – अमरावती. |
| अभियोग पक्षातर्फे वकील | **श्रीमती एल. टी. गेडाम**, सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **चंद्रवदन ऊर्फ कपील भिमराव खोब्रागडे,**<br>वय – ३३ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – शिरजगाव मोझरी,<br>ता. तिवसा, जि. अमरावती. |
| आरोपीतर्फे अधिवक्ता | **विद्वान विधिज्ञ श्री. पी. पी. गाडे.** |

## भाग ब
## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २९.०२.२०२४ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | २९.०२.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०१.०४.२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २१.०६.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ११.०८.२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही. |
| न्यायनिर्णय घोषीत तारीख | **०२.०६.२०२६** |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही. |

## आरोपीचा तपशील

| आ. क्र. | आरोपीचे नांव | समजपत्र दिल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | चंद्रवदन ऊर्फ कपील भिमराव खोब्रागडे | २९.०२. २०२४ | १९.०५. २०२५ | भा.दं.वि., १८६० चे कलम ३२४, व ५०४ | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

## न्यायनिर्णय
## (पारीत दिनांक ०२.०६.२०२६ )

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ व ५०४ (थोडक्यात 'भा.दं.वि.,१८६०') अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता संपरिक्षा चालविण्यात आली.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

२. दिनांक २९.०२.२०२४ रोजी दुपारी १:०० वाजताच्या दरम्यान रवि हगवणे याच्या घरासमोर, शिरजगाव मोझरी, ता. तिवसा, जि. अअमरावती येथे आरोपी हा फिर्यादीकडे तिन महिन्यापुर्वी रोजनदारीने जुडाई कामाला होता. त्यावेळेस फिर्यादीने आरोपीकडुन टामी पाना कामासाठी घेतला होता. घटनेच्या दिवशी रविभाऊ हगवणे यांचेकडे फिर्यादीचे सेट्रींगचे काम सुरु असतांना आरोपी हा तेथे आला व फिर्यादीला म्हणाला की, “माझी टामी दे" तर त्यास फिर्यादीने संध्याकाळी देतो असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला शिविगाळ करुन लोबाझोंबी केली. आरोपीने त्याच्या हातातील कळ काठुन फिर्यादीच्या तोंडावर नाकावर मारले. त्यामुळे फिर्यादीच्या नाकातुन रक्त निघाले. म्हणुन, सदरच्या घटनेवरुन फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, तिवसा येथे फिर्याद नोंदविली.

३. फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, तिवसा येथे आरोपीविरुध्द गुन्हा क्रमांक ११०/२०२४ नुसार भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. त्याचा तपास स.पो. उपनिरीक्षक श्री. देशकरी, ब. नं. १०४४ यांनी

केला. त्यांनी घटनास्थळावर जाऊन पंचांसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. तसेच साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपास पुर्ण करुन तपासी अधिकारी यांनी न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. संपरीक्षेदरम्यान आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक १० नुसार दोषारोप निश्चीत केला. सदरचा दोषारोप हा आरोपीला मराठी भाषेमध्ये वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपीने तो नाकबुल असल्याचे सांगीतले व खटला पुढे चालविण्याची मागणी केली.

५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले. निशाणी क्रमांक १ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा त्यांच्या विनंतीवरुन बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ३१३ (१)(ब) अन्वये आरोपीचे निवेदन (नि.क्र.१९) वर नोंदविण्यात आले.

६. अभियोग पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एल. टी. गेडाम व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. पी. गाडे यांचा युक्तीवाद ऐकला.

७. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीचे विद्वान विधीज्ञ यांनी केलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे न्यायनिवाडा करण्याकरीता माझ्या पुढे उद्भवले. त्यांचे सकारण निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने फिर्यादी नामे योगेश रामदासजी जवंजाळकर याला हातातील कळयाने त्याच्या तोंडावर व नाकावर मारहाण करुन जखमी केल्यामुळे भा.दं.वि.१८६० चे कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| २. | आरोपीने फिर्यादी नामे योगेश रामदासजी जवंजाळकर याने सार्वजनीक शांततेचा भंग करावा किंवा अन्य कोणताही अपराध करावा या उद्देशाने त्याचा अपमान करुन त्याला प्रक्षोभीत करून भा.दं.वि.१८६० चे कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| ३. | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे आरोपीची निर्दोष सुटका करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ व २ करीता –**

८. वरील दोन्ही मुद्दे एक सारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची व तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहेत.

आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादी म्हणुन साक्षीदार क्रमांक १ योगेश (नि.क्र.१४) याला तपासले. त्याने त्याच्या पुराव्यादरम्यान घटनेबद्दल त्याला काहीही माहीत नसल्याचे त्याने सांगीतले. घटनेच्या दिवशी त्याचा व आरोपीचा शाब्दीक वाद झाल्याचे त्याने सांगीतले. त्याने रागाच्या भरात पोलीस स्टेशन, तिवसा येथे रिपोर्ट दिल्याचे सांगीतले. तसेच पोलीसांनी त्याचे बयाण नोंदविले नसल्याचे त्याने सांगीतले. सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याकारणाने भारतीय पुरावा कायदयाच्या कलम १५४ नुसार अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाचे उत्तर सुचक प्रश्नामध्ये मान्य केले की, दिनांक २९.०२.२०२४ रोजी तो रवि हगवणे यांच्याकडे सेट्रींगचे काम करत असतांना आरोपी त्याला म्हणाला की, “माझी टामी दे" त्यावर त्याने मी संध्याकाळी तुला टामी देतो असे म्हटले असता आरोपीने त्याला शिविगाळ केली व त्याच्यासोबत झोबाझोबी केली. सदरहु साक्षीदार हे देखील मान्य करतो की, आरोपीच्या हातातील कळे त्याच्या तोंडावर व नाकावर लागल्यामुळे त्याच्या नाकातुन रक्त निघाले होते. तसेच त्याने आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, तिवसा येथे फिर्याद (नि.क्र.१५) व छापिल प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.१६) नोंदविल्याचे सुध्दा मान्य केले.

९. साक्षीदार क्रमांक १ योगेश (नि.क्र.१४) याने आरोपी तर्फे त्याच्या घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्याने मान्य केले की, त्याने रागाच्या भरात आरोपीविरुध्द

खोटी फिर्याद नोंदविली. तसेच त्याने मान्य केले की, त्याने आरोपीची टामी घेतल होती व सदर टामी मागण्यासाठी आरोपी त्याच्या घरी असता त्याने आरोपीची टामी त्याला देत नसल्यामुळे आरोपी व त्याच्यामध्ये झोबाझोंबी झाली. तसेच त्याने स्पष्टपणे मान्य केले की, सदरच्या झोबांझोबीमध्ये त्याला त्याच्या हातातील कळे लागले होते. त्याचे पोलीसांनी बयाण नोंदविले नसल्याचे सुध्दा मान्य केले आहे. सदर साक्षीदाराच्या बयाणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरहु साक्षीदाराने अभियोग पक्षास आरोपीविरूध्द सदरचा खटला सिध्द करण्याकरीता कोणतेही सहकार्य केलेले नाही. तसेच त्याने त्याच्या उलटतपासादरम्यान आरोपीच्या हातातील कळे त्याला लागले नसुन त्याच्या हातातील कळे त्याला लागल्याचे मान्य केले आहे. फिर्यादीने (नि.क्र.१३) वर पुरसीस दाखल करुन त्याचा आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याचे व सदर आरोपीविरुध्द इतर कुठलाही साक्षीदार तपासयाचा नसल्याचे कथन केले आहे.

१०. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच म्हणुन साक्षीदार क्रमांक २ नरेश (नि.क्र.१७) याला तपासले. त्याने त्याच्या सरतपासादरम्यान त्याला घटनेबद्दल काहीही माहीत नसल्याचे त्याने सांगीतले. पोलीसांनी त्याच्यासमक्ष कोणताही घटनास्थळ पंचनामा तयार केला नसल्याचे त्याने सांगीतले. घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही असुन त्यातील मजकुर त्याला माहीत नसल्याचे त्याने सांगीतले. सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास मदत करत नसल्याकारणाने भारतीय पुरावा

कायदयाच्या कलम १५४ नुसार अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारले. परंतु, सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाचे सर्व उत्तर सुचक प्रश्न नाकारले. सदरहु साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरहु साक्षीदाराने अभियोग पक्षाला आरोपी विरुध्द घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यात कुठलीही मदत केली नाही.

**११.** अभियोग पक्षातर्फे इतर कुठलाही साक्षीदार तपासण्यात आला नाही. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी ही पुर्णपणे अभियोग पक्षावर असते. अभियोग पक्षाकडुन तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्याने अभियोग पक्षाला आरोपीविरूध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्यामध्ये कुठलीही मदत केलेली नाही. अभियोग पक्षाच्या साक्षीदाराने आरोपीविरूध्द कुठलाही पुरावा दिलेला नाही. अभियोग पक्षाने तपासलेल्या फिर्यादी योगेश (नि.क्र.१४) याने आरोपीविरूध्द रागाच्या भरात खोटी फिर्याद नोंदविल्याचे सांगीतले. तसेच त्याला त्याच्या हातातील कळे नाकावर व तोंडावर लागल्यामुळे त्याच्या नाकातुन रक्त निघाल्याचे त्याने उलटतपासादरम्यान मान्य केले आहे. यावरुन हे स्पष्टपणे दिसुन येते की, आरोपीच्या हातातील कळयाने त्याला मारहाण झाली नाही.

**१२.** अभियोग पक्षाने तपासी अधिकाऱ्याला तपासले नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपीविरूध्दची फिर्याद सिध्द करू शकला नाही. तसेच अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी यांना तपासले नाही म्हणुन फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र सिध्द केले नाही.

त्याचप्रमाणे अभियोग पक्ष हा आरोपीविरूध्द घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करून घेण्यासही अपयशी ठरला आहे. तसेच अभियोगपक्ष हा इतर महत्त्वाचे साक्षीदार तपासण्यात अपयशी ठरला. अभियोग पक्षाने घेतलेल्या पुराव्याचे एकंदरीत अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपीने फिर्यादीला आरोपीच्या हातातील कळयाने मारुन जखमी केल्यासंबधीचा व फिर्यादीने सार्वजनिक शांततेचा भंग करावा या उद्देशाने अपमानीत करुन प्रलोभीत केल्यासंबंधीचा कुठलाही सबळ व पुरेसा पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

**१३.** अभिलेखावर दाखल असलेल्या पुराव्याच्या आधारे हे न्यायालय या निष्कर्षावर पोहोचत आहे की, अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्द सबळ पुराव्याअभावी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ व ५०४ नुसारचा दोषारोप संशयापलीकडे सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरलेला आहे. **त्यामुळे सदर न्यायालय मुद्दे क्रमांक १ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.**

**<u>मुद्दा क्रमांक ३ करीता –</u>**

**१४.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकारचा सबळ, विश्वसनीय, पुरेसा व संशयाच्या पलीकडचा पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. त्यामुळे सदर खटल्यातुन आरोपीला निर्दोष मुक्त करणे योग्य होईल, असे दिसुन येते. जप्त मुद्देमाल एक पांढऱ्या धातुचे हातातील कळे १० से.मी. हे अपील कालावधीनंतर त्याच्या मालकी

हक्काबाबत पडताळणी केल्यानंतर त्याच्या मुळ मालकास परत करण्यात यावे. **सदर न्यायालय मुद्दा क्रमांक ३ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

## आदेश

१. आरोपी **चंद्रवदन ऊर्फ कपील भिमराव खोब्रागडे**, वय – ३३ वर्षे, व्यवसाय – मजुरी, राहणार – शिरजगाव मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती यांची प्रस्तुत खटल्यातुन भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ व ५०४ अन्वयेच्या गुन्हयांमधुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल एक पांढऱ्या धातुचे हातातील कळे १० से.मी. हे अपील कालावधीनंतर त्याच्या मालकी हक्काबाबत पडताळणी केल्यानंतर त्याच्या मुळ मालकास परत करण्यात यावे.

३. आरोपीचा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ नुसार रुपये १५,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा दयावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला).**

स्वा/–
**(रोहिणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तिवसा,
ता. तिवसा, जि. अमरावती.

दिनांक : **०२.०६.२०२६.**
स्थळ : **तिवसा**

## भाग क

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (iii)]

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

**अ. अभियोग :–**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| साक्षीदार क्रमांक १ | योगेश रामदासजी जंवजाळकर (नि.क्र.१४) | फिर्यादी |
| साक्षीदार क्रमांक २ | नरेश रामकृष्ण प्रभे (नि.क्र.१७) | घटनास्थळ पंच |

**ब. बचाव साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

**अ. अभियोग :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१५/सा.क्र.१ | फिर्याद. |
| २. | नि.क्र.१६/सा.क्र.१ | छापिल प्रथम खबरी अहवाल. |

**ब. बचाव :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल :–**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

स्वा/–
**(रोहिणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तिवसा,
ता. तिवसा, जि. अमरावती.

दिनांक : **०२.०६.२०२६.**
स्थळ : **तिवसा**

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per original Judgment."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **Vijay K. Kaware** |
| Name of Court | : | Civil and Criminal Court, Teosa |
| Judgment dictated on | : | 02.06.2026 |
| Transcript ready on | : | 02.06.2026 |
| Judgment Signed by Presiding Officer on | : | 02.06.2026 |
| Judgment uploaded on | : | 02.06.2026 |